चक्रवर्ती झाला 'ज्ञानोबा'!

दिवस मंदीचे आहेत आणि नाटकधंद्यासाठी तर ते कायमचेच मंदीचे आहेत. अशा दिवसांत एका नाटकाचा कर्टन रेझर वाजतगाजत साग्रसंगीत सादर करणं ही अचंब्याची गोष्ट न ठरली तरच नवल! मोठी नवलाची गोष्ट ही होती की, हे श्रीपाद सेवा मंडळ नामक एका वारकरी संस्थेची निर्मिती असलेलं नाटक होतं आणि तरीही नाट्यक्षेत्रातल्या आणि भक्तीक्षेत्रातल्या निवडक नामवंत आणि निमंत्रितांपुढे सादर केलेला 'ज्ञानोबा माझा'चा ट्रेलर पूर्णपणे प्रोफेशनल होता. माटुंग्याच्या यशवंत नाट्यमंदिरात नाटकाचा सेट उभारून संपूर्ण प्रकाशयोजना, वेशभूषारंगभूषेसह ऋग्वेद संस्थेने 'ज्ञानोबा माझा'मधले काही निवडक प्रसंग सादर केले.



श्रीपाद सेवा मंडळ आणि ऋग्वेद ही अशोक समेळांची संस्था, या दोघांनी मिळून या महत्त्वाकांक्षी नाटकाची निर्मिती केली आहे. 'संन्यस्त ज्वालामुखी' हे स्वामी विवेकानंदांच्या जीवनावरचं देखणं नाटक सादर केल्यानंतर संत ज्ञानेश्वरांच्या आयुष्याला गवसणी घालणाऱ्या या नाटकाचा प्रस्ताव समेळांकडे चालून आला असावा, असा कयास आहे. वारकरी संप्रदायातील ज्येष्ठ अभ्यासक-विचारवंत मामासाहेब देशपांडे यांनी ४० वर्षांपूर्वी लिहून ठेवलेल्या 'चैतन्य चक्रवर्ती' या संगीतमय नाटकाचं अशोक समेळांनी पुनर्लेखन करून 'ज्ञानोबा माझा' हे नाटक सिद्ध केलं आहे. त्याचं दिग्दर्शन अर्थातच समेळांचं आहे. संगीत डॉ. विद्याधर ओकांचं तर नेपथ्यरचना राजन भिसेंची आहे. 'इंद्रधनू'चे शिशिर जोग हे निर्मिती व्यवस्था सांभाळत आहेत. ज्ञानेश्वरांचे वडील विठ्ठलपंत यांनी संन्यास घेतल्यानंतर त्यांचे गुरु त्यांना पुन्हा गृहस्थाश्रमात परतण्याची आज्ञा फर्मावतात इथून सुरु होणारं हे नाटक ज्ञानदेवांच्या संजीवन समाधीपर्यंत येऊन संपतं.



अशोक समेळांच्या ऋग्वेद संस्थेने ठाण्यातल्या टेंभी नाक्याच्या म्युनिसिपल शाळेत स.पा. जोशी रंगमंच उभारून होतकरु मुलांसाठी वाट्टेल तेव्हा येऊन नाटक आणि थिएटर एक्सरसाइज करून बघण्यासाठी एक हक्काची जागा उपलब्ध करून दिली. इथे नियमित येणाऱ्या मुलांमधून २३ कलाकार निवडून समेळांनी 'ज्ञानोबा माझा' बसवलं आहे. यातली वेदश्री आगाशे ही नाटकात ज्ञानेश्वरांचं काम अत्यंत आत्मविश्वासाने आणि तडफेने करते. तिच्या कामाची झलक पाहून ज्येष्ठ गायक नट प्रसाद सावकार म्हणाले, 'बालचंद्र पेंढारकरांनी 'गीता गाती ज्ञानेश्वर' या नाटकाची निर्मिती केली होती त्यात मी ज्ञानेश्वरांचं काम केलं होतं, पण आज मी खरा ज्ञानेश्वर बघतो आहे, असं वाटलं.' प्रभाकर पणशीकर म्हणाले, 'आज जातीपातींचं राजकारण वाढलं आहे. अशावेळी विश्वात्मकतेचा संदेश देणाऱ्या ज्ञानेश्वरांवरच्या नाटकाची नितांत गरज आहे. ती हे नाटक पूर्ण करील.'

कर्टन कॉल

लिम्का बुकात 'ज्वालामुखी'

२६ नोव्हेंबरला मुंबईवर झालेल्या अतिरेकी हल्ल्याला उत्तर म्हणून 'ऋग्वेद' संस्थेने स्वामी विवेकानंदांचं चरित्र नाटक 'संन्यस्त ज्वालामुखी' २० आणि २१ डिसेंबर रोजी रवींद्र नाट्यमंदिरात सादर करून धैर्याचं दर्शन घडवलं. सलग ४० तासांत या नाटकाचे ११ प्रयोग कलावंतांनी सादर केले. संग्राम समेळची प्रभावी भूमिका असलेले हे सर्व प्रयोग रंगले. 'लिम्का बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड'ने या विक्रमाची दखल घेऊन त्याची नोंद केली आहे. २५ ऑक्टोबर रोजी दुपारी या नाटकाचा दीनानाथ नाट्यगृहात प्रयोग आहे.

नाटकाची झलक पाहण्यासाठी आळंदीहून राजाराम्भाऊ चोपदार आणि डॉ. संजय बर्वे आले होते. त्यांनी सांगितलं की, आळंदीच्या संजीवन समाधीपाशी नाटकातल्या कलाकारांनी नाटकातला काही भाग सादर केला तेव्हा देवस्थानची बुजूर्ग मंडळी या छोट्या कलाकारांच्या पाया पडली कारण त्यांनी त्यांच्यात माऊलींना पाहिलं.

ज्ञानेश्वरांचे चमत्कार आणि तत्त्वज्ञान अशा दोहोंचा मिलाफ असलेलं सूचक नेपथ्यानिशी आणि मधुर संगीताच्या साथीने सादर होणाऱ्या या नाटकाचा पहिला प्रयोग २५ ऑक्टोबर रोजी सकाळी १०.३० वाजता गिरगावातल्या साहित्य संघ मंदिरात होतोय.

–विंगमास्टर